# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

❖ **मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभांचे तत्काळ वितरण**

दिनांक 30 जून 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मुकादम राजेंद्र तंगवेल, सफाई कामगार रायापण रंगनाथन, मुनियन अलकनंदन, नटराजन नरोत्तम आणि शशिकांत ठाकुर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशीच महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते सेवानिवृत्तीबाबतचे सर्व लाभ अदा करण्यात आले.

महापालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवा उपदान, रजा रोखीकरण, निवृत्तीवेतन अंशराशीकरण इत्यादी लाभ देण्यात येतात. पूर्वी या लाभांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातत्याने कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत असत. मात्र, कर्मचाऱ्यांची ही गैरसोय दूर करण्यासाठी मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार दरमहा सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी सर्व सेवा लाभ वितरित करण्याची कार्यपद्धती दरमहा राबविण्यात येत आहे. मुकादम राजेंद्र तंगवेल, सफाई कामगार रायापण रंगनाथन, मुनियन अलकनंदन, नटराजन नरोत्तम आणि शशिकांत ठाकुर यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने जबाबदारी पार पाडली. त्यांच्या सेवेचे कौतुक करत त्यांना सन्मानपूर्वक लाभ प्रदान केले. या प्रसंगी, सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मा. आयुक्त तसेच उपायुक्त व संबंधित विभागप्रमुख यांचे आभार मानले व महापालिकेकडून मिळालेल्या सन्मानाने भावूक होत समाधान व्यक्त केले.

30/06/2025